**पुढील सरतपास सामनेवालातर्फे वकील श्री.एस.बी.खारे यांचेमार्फत शपथेवर सुरु.**

८. नि.क्र.सी.डब्लु—१ वरील लेखी सरतपासातील सर्व मजकूर हा माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर असून त्यावरती माझी सही आहे.

**उलटतपास अर्जदारतर्फे वकील श्री.डी.पी.केकडे यांचेमार्फत सुरु.**

९. हे म्हणणे खरे आहे की अर्जदार हे सामनेवाला बॅंकेमध्ये सन १९७९ मध्ये कामास लागले आणि दि.१२/०५/२००८ साली त्यांना सामनेवाला बॅंकेने सेवेतुन बडतर्फ केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार यांची सामनेवाला बॅंकेकडे एकुण २९ वर्षे सलग सेवा केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मॅनेजर म्हणुन कामावर असताना सर्वात शेवटी अर्जदार यांना दरमहा रक्कम रू. १७,८७२/— इतका पगार मिळत होता. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार यांनी त्यांना कामावरून बडतर्फ केल्यानंतर या मे.कोर्टामध्ये तक्रार अर्ज क्र.४०/२०११ दाखल केली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर केसचा निकाल सामनेवाला बॅंकेसारखा लागला. हे म्हणणे खरे आहे की, सदर निकालाविरूध्द अर्जदार यांनी मे. औद्योगिक न्यायालय, सोलापूर येथे रिव्हीजन अर्ज क्र.१०/२०१७ दाखल केला होता आणि त्याचा निकाल दि.२३/११/२०२३ रोजी सामनेवाला बॅंकेतर्फे लागला. हे म्हणणे खरे आहे की, सदर दोन्ही निकालांविरूध्द ना.उच्च न्यायालयामध्ये उभयपक्षांनी रिट पिटीशन दाखल केलेले नाही.

१०. हे म्हणणे खरे आहे की, सामनेवाला बॅंकेस औद्योगिक कलह कायद्याच्या तरतुदी लागु आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दि.१२/०५/२००८ ला अर्जदाराला बडतर्फ केल्यानंतर बॅंकेने शिल्लक हक्क रजेचा पगार आणि शिल्लक वैद्यकीय रजा यांच्या रकमा अदा केलेल्या नाहीत आणि त्यांना त्याबाबत काही कळवलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदाराने मा.औद्योगिक न्यायालयातील निकालानंतर शिल्लक हक्क रजेचा पगार आणि शिल्लक वैद्यकीय रजा रक्कम मागणी करणारा अर्ज सामनेवाला बॅंकेकडे केला होता. हे म्हणणे खरे आहे की, दि.

१४/०२/२०२४ रोजी बॅकेने अर्जदारांना उत्तर दिलेले आहे. हे म्हणणे खरे ।अहे की, दि.१४/०२/२०२४ च्या उत्तरामध्ये हक्क रजेचा आणि वैद्यकीय रजेचा उल्लेख बॅकेने केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार प्रस्तुत प्रकरणात मागणी केल्याप्रमाणे शिल्लक हक्क रजेचा पगार आणि शिल्लक वैद्यकीय रजा रक्कम मिळण्यास पात्र आहे. हे म्हणणे खरे नाही की, मा.औद्योगिक न्यायालय, सोलापूर येथे रिव्हीजन अर्ज चालु असताना उभयपक्षांमध्ये तडजोडीची चर्चा सुरू होती. हे म्हणणे खरे नाही की, मे.औद्योगिक न्यायालयापुढे तडजोडीची चर्चा चालु असल्याबाबतचा लेखी अर्ज दिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मे.औद्योगिक न्यायालयामध्ये रिव्हीजन अर्ज चालु असताना मी बॅकेतर्फे काम पहात होतो. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार यांनी प्रशासकाकडे रक्कम मागणीचा अर्ज दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदाराच्या मागणीचा विचार करून प्रशासकाने रक्कम रू.४,२५,०००/— चेक तयार केला होता. हे म्हणणे खरे नाही की, चेक तयार केल्याची माहिती असुन देखील मी खोटा जबाब देता आहे. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला बॅकेला मदत करण्यासाठी मी खोटा जबाब देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती

KALYANI RAJARAM ADAKE
Digitally signed by KALYANI RAJARAM ADAKE
Date: 2026.01.05 17:35:05 +0530

(क. रा. आडके)
पिठासिन अधिकारी तथा न्यायाधीश,
कामगार न्यायालय, सोलापूर.

सोलापूर.
दिनांक : ०५/०१/२०२६